नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक १९/०७/२०२२ (मंगळवार)**

**(दुपार)**

---

## फसवणुक

पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत ०८ कि.मी. अंतरावरील मौजा विवरा येथे दिनांक २५/०६/२०२० ते दि. ०४/०१/२०२१ चे दरम्यान फिर्यादी नामे– श्री.साहेबराव चंपतराव डवरे वय ६१ वर्ष रा. विवरा ता.नरखेड व इतर २२ शेतकरी यांनी त्यांचे शेतात उत्पादीत होणारा शेतमाल कापूस, चना व तूर असा उत्पादीत माल व्यापारी आरोपी नामे– नंदकिशोर विठ्ठलराव चौधरी वय ५२ वर्ष रा.विवरा ता.नरखेड यास हंगाम माहे जून २०२० ते माहे डिसेंबर २०२१ मध्ये विकला होता. सदर आरोपी शेतमाल खरेदी करून शेतमालाचा मोबदला एकुण २६,५०,१५०/–रूपये दिले नाही. तसेच तसेच शेतकऱ्यांना आपल्या बॅक खात्याचे चेक दिले होते. आरोपीचे खात्यात रक्कम अपूरी असल्याने चेक न वटल्याने चेक बाउन्स झाले. याबाबत आरोपीने फसवणुक केल्याबाबत तक्रार अर्ज पोलीस अधिक्षक कार्यालय नागपूर ग्रामीण येथे केल्याने सदर अर्जाची चौकशी आर्थीक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण येथे केली असता नमूद आरोपी व इतर आरोपीने गाव विवरा येथील एकुण २३ शेतकरी यांचे शेतमाल जाणीवपुर्वक खरेदी करून त्याचा मोबदला शेतकऱ्यांना न देता कपटीपणाने एकुण २६,५०,१५०/– रूपयाची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ४२०, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री ए.के नेवारे आर्थीक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण मो.नं. ९६८९९९००२० हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

१) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत १२ कि.मी अंतरावरील राहते घरी पाटणसावंगी वार्ड क्र. ३ सावनेर येथे दिनांक १८/०७/२०२२ चे ०६:४५ वा. दरम्यान **वासुदेव लक्ष्मण क्षिरसागर(मृतक), वय ६४ वर्ष रा. वार्ड क्र. ३ पाटणसावंगी सावनेर** हे मागील दोन वर्षापासुन त्यांची प्रकृती खराब असल्याने व त्यांना लकवा मारल्याने ते मानसिक तनावामध्ये राहत होते. या कारणावरुन त्यांनी आपले राहते घराचे टावरचे लोखंडी ॲगलला नॉयलानची दोरी बांधुन गळफास घेतल्यानंतर ते मृत अवस्थेत आढळून आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– नितीन वासुदेव क्षिरसागर वय ३३ वर्ष रा. वार्ड क्र. ३ पाटणसावंगी सावनेर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. सावनेर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा बंडु कोकाटे मो.न ९८२२९४३६०५ हे करीत आहे.

२) पो.स्टे. जलालखेडा :— अंतर्गत पांढर ढाकणी ता.नरखेड येथे दिनांक १७/०७/२०२२ चे १७:१० वा. दरम्यान **विकी विनायक कवरती (मृतक), वय २२ वर्ष, रा. पांढरढाकणी ता.नरखेड** याची आई वेडसर असल्याने तिचे सोबत नेहमी वाद होत होता. विकी कवरती याने त्याचे राहाते घरी गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला. त्यास लोकांच्या मदतीने खाली उतरुन पी.एच.सी जलालखेडा येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— विठल बारकूजी कवरती वय ५५ वर्ष, रा. पांढर ढाकणी ता.नरखेड यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. जलालखेडा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक तायडे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर